पुढारी

पुढारी Anchor

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या ५५४ विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ५५४ विद्यार्थ्यांची निवड राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे झाली आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी २५० मुली आणि ३०४ मुले असून, त्यांना सरासरी वार्षिक साडेपाच लाख रुपयांचे पॅकेज प्राप्त झाले आहे.



**नाशिक : प्लेसमेंटमध्ये नोकरी मिळवलेले के. के. वाघ महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

वर्षभरात सुमारे २०० हून अधिक कंपन्यांनी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. आयटी क्षेत्रातील झेन्सार, फिनिक, जोश सॉफ्टवेअर, पे-यू, टीसीएस, फॉक्स सोल्युशन्स, अरेस सॉफ्टवेअर यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांसह एबीबी, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स, श्नाइडर इलेक्ट्रिक, बर्न्स अँड मॅकडोनेल, इमर्सन यांसारख्या कोअर क्षेत्रातील कंपन्यांनीही विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. विशेष म्हणजे, महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांना परदेशातही रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. प्लेसमेंटमध्ये आयटी शाखांमधील (कॉम्प्युटर, आयटी, एआयडीएस, सीएसडी आणि एमसीए) २१४ विद्यार्थी, कोअर शाखांमधील (मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, ई अँड टीसी, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन आणि सिव्हिल) २८० विद्यार्थी तसेच एमबीए विभागातील ६० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

एमबीए विभागातील विद्यार्थ्यांची डिजिटाइड, इको पाइप, फ्लिपकार्ट, महिंद्रा लॉजिस्टिक्स आणि प्रोमील बायोटेक यासारख्या कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. यावर्षी आयटी कंपन्यांबरोबरच कोअर क्षेत्रातील कंपन्यांमध्येही उल्लेखनीय प्लेसमेंट झाली आहे, अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांचा विकास करून समाजाभिमुख अभियंते घडविणे हे आमचे ध्येय असून, भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी ते सज्ज असतील, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभागप्रमुख डॉ. स्नेहल कमलापूर, डॉ. रवींद्र मुंजे, डॉ. प्रीती भामरे, डॉ. सुनिता उगले आणि डॉ. प्रशांत कुशारे यांनी संबंधित विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

Nashik Edition
Jun 26, 2026 Page No. 08
Powered by: erelego.com